http://lokadesh.in

मूल्य १ रु.

# लोकादेश

महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यताप्राप्त साप्ताहिक

मुख्य संपादक : साजीद बडगुजर

किनवट, वर्ष १७ वे, अंक ३० वा, सोमवार, दि.१५ जुलै २०२४, पाने ०४

RNI No. MAHMAR/2007/20732

Post Regd.NO G-2/RNP/NND-323/2023-2025

## सीईओ मीनल करणवाल यांची शिवशक्तीनगर आदिवासी गावास भेट; पीएम जनमत योजना व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणीसाठी संवाद





**किनवट/नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी शनिवार दिनांक १३ जुलै रोजी जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या किनवट तालुक्यातील घोगरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत शिवशक्तीनगर या आदिवासी गावात पोहोचल्या. गावाच्या मुख्य ठिकाणापासून तीन किलोमीटर अंतर पायी प्रवास करून त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला.**

यावेळी त्यांनी प्रधानमंत्री आदिवासी न्याय महाअभियान (पीएम- जनमन) अंतर्गत आदीम व कोलाम समाजातील लाभार्थ्यांना शासकीय विविध योजनेचे लाभ यासंदर्भात कामांची पाहणी केली. तसेच गावातील महिला भगिनींना त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती देवून पात्र लाभार्थ्यांचे अर्ज देखील भरून घेतले.

राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी जिल्हा प्रशासनाने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहे. यासाठी प्रत्येक गावांमध्ये कॅम्प घेवून अर्ज स्वीकारण्याची सुविधा करण्यात आली आहे. या योजनेसाठी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल हे दररोज आढावा घेत असून ठिकठिकाणी भेटी देत आहेत. आज मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी किनवट तालुक्यातील शेवटचे टोक असलेल्या शिवशक्तीनगर गावास भेट देवून संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री आदिवासी न्याय महाअभियान (पीएम-जनमन) अंतर्गत गाव स्तरावरील घरकुलांची पाहणी केली. त्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत महिलांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी आदिवासी महिलांनी सादर केलेल्या हुसाडी नृत्यात मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी सहभागही नोंदवला, ज्यामुळे गावकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. गावकऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांचे स्वागत मोठ्या आदराने केले आणि त्यांच्या आगमनाने गावात एक नवीन ऊर्जा संचारली होती. यावेळी त्यांनी आदिवासी महिलांनी बांबू पासून बनवलेल्या विविध वस्तूंची पाहणी करून कौतुक केले.

यावेळी अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे सदस्य गोवर्धन मुंडे, गट विकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव, समाजसेवक दत्ता आडे, तालुका आरोग्य अधिकारी के.पी. गायकवाड, बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती ठकरोड, पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता टारपे, बांधकाम विभागाचे उप अभियंता कावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवार, विस्तार अधिकारी व्ही.एम. मुकनर, पी.एस. वाघमारे, मुकेश पाटील आदींची यावेळी उपस्थिती होती.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेची माहिती गावागावात देण्यासाठी दररोज वेगवेगळ्या गावात मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल ह्या भेटी देत आहेत. त्यांनी किनवट तालुक्यातील जिल्ह्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या शिवशक्तीनगर या वनक्षेत्रात स्थित असलेल्या गावास भेट दिली. या गावात जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे त्यांनी वन क्षेत्रातून तीन किलोमीटर अंतर पायी चालून गावात पोहोचल्या आणि मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण या योजने संदर्भात ग्रामस्थांना माहिती दिली. तसेच प्रधानमंत्री आदिवासी न्याय महाअभियान (पीएम- जनयन) अंतर्गत आदिम व कोलाम घरकुल कामांची पहाणी केली.**

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा : आमदार भीमराव केराम यांचे आवाहन



**किनवट प्रतिनिधी राज्यातील महिलांच्या हितासाठी शिंदे फडणवीस सरकारने १ जुलैपासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्वकांक्षी योजना सुरू केली असून या योजनेअंतर्गत पात्र महिलांना प्रतिमाह १५०० रु अनुदान स्वरूपात देण्यात येणार आहेत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज दाखल करता येणार असून किनवट शहरासह तालुक्यातील सर्व पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार भीमराव केराम यांनी केले आहे**

केंद्र व राज्य सरकारने महिला शेतकरी कामगार व मजुरांसाठी अनेक महत्वकांक्षी योजना सुरू केल्या आहेत.देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उज्वला गॅस योजना व पंतप्रधान घरकुल आवास योजना सुरू करून दुर्बल घटकातील महिला वर्गाचे सक्षमीकरण केले आहे तर नमो शेतकरी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपये हजार रुपये अनुदान देण्यात येते. यात राज्यातील शिंदे व फडणवीस सरकारने महिलांच्या हितासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण महत्वकांक्षी योजनेची भर घातली असून १ जुलैपासून पासून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. राज्यातील कोणतीही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभ केली केली आहे.केवळ मतदान कार्ड, आधार कार्ड, पिवळे अथवा केशरी केसरी रंगाचे राशन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र असणाऱ्या तसेच २१ ते ६५ वर्षे वय असणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.या योजनेअंतर्गत एका कुटुंबातील विवाहित महिलेसह अविवाहित महिलाही पात्र असणार आहे. सेतू केंद्रामार्फत अथवा गावातील अंगणवाडी सेविकेमार्फत कागदपत्रांची पूर्तता करून ऑनलाईन अर्ज भरता येणार आहेत.यासाठी नारीशक्ती दूत हे प सुरू केले असून महिलांना घरबसल्या देखील या पद्वारेही ऑनलाइन अर्ज भरता येणार आहेत.किनवट माहूर तालुक्यात जोरदार प्रचार व प्रसार सुरु आहे. महिलांना अर्ज करताना कोणतीही अडचण उद्भवणार नाही यासाठी तहसील कार्यालयात एक खिडकी योजना सुरु करण्याच्या सूचना दिल्या आहेत.सेतू केंद्र,अंगणवाडी सेविका यांच्यामार्फत ऑनलाईन अर्ज करताना किंवा अत्यावश्यक कागदपत्रे काढताना कोणी आगाऊ पैशाची मागणी करत असेल तर लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात संपर्क करावा असे आवाहन आ भीमराव केराम यांनी केले आहे

विशेष म्हणजे ३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज भरलेल्या पात्र महिलांना १ जुलै पासूनचे अनुदान लागू होणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे.

## बोधडी बु. येथे तरुण शेतक-याची निर्घृण हत्या

**किनवट,दि.१४(प्रतिनिधी) : तालुक्यातील बोधडी बु. येथे स्वतःच्या शेतात घर बांधून राहणाऱ्या एका तरुण शेतकऱ्याचा कुण्या अज्ञात चार इसमांनी निर्घृण हत्या केली असून, मयताच्या आईलाही या मारेकऱ्यांनी जबर मारहाण करून गंभीर जखमी केल्यामुळे तिला उपचारार्थ तेलंगणातील आदिलाबाद येथे पाठविण्यात आले आहे. ही घटना शनिवारी (दि.१३ जुलै) रात्री साडेनऊ ते दहा च्या दरम्यान घडल्याचे पोलीस सूत्रांकडून समजले.**

प्राप्त झालेल्या माहितीनुसार, बोधडी बु.रेल्वे स्टेशनजवळील डोंगराच्या कडेला असलेल्या शेतातील आंबे व चिकूच्या झाडांच्या राखणीसाठी राम महादेव केंद्रे (वय ३८ वर्षे) हा आपली आई गयाबाई महादेव केंद्रे (वय ६० वर्षे) यांच्यासह शेतातच टिनाचे घर बांधून रहात होता. सात-आठ वर्षापूर्वी हे कुटुंब उदगीर वरून बोधडी येथे स्थलांतरित झाल्याचे कळाले. राम केंद्रे हा विवाहित असून, पत्नी तिनूबाई ही आपल्या दोन मुलांच्या (मुलगा व मुलगी) शिक्षणासाठी हैदराबाद येथे खाजगी नोकरी करीत रहात असल्याचे एका गावकऱ्याकडून समजले. शनिवारी रात्री साडेनऊच्या सुमारास मुलास कुणाचा तरी मोबाईलवरून बाहेर कुठेतरी बोलावल्याचा निरोप आला होता. राम बाहेर गेल्यावर



त्यास चार अज्ञात व्यक्तींनी संगनमताने अज्ञात कारणास्तव कुऱ्हाडीने व दगडाने डोक्यात घाव घालून ठार मारले आणि त्याचे शरीर तसेच फरफटत ५० ते ६० फूट अंतरावर नेऊन टाकले अशी माहिती जखमी आईने दिल्याची चर्चा घटनास्थळी होती. नंतर आईलाही या मारेकऱ्यांनी जबर मारहाण करीत गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. जखमी आई गयाबाई हिच्या फिर्यादीवरून या अज्ञात मारेकऱ्यांविरूद्ध गु.र.नं. २०३/२४ भारतीय न्याय संहितेचे कलम १०३(१),१०९,३(५) द्वारे किनवट पो.स्टे.मध्ये गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. देवीदास चोपडे करीत आहेत.

## मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेतून एकही पात्र महिला वंचित राहू नये : गिरीश महाजन



- **ऑफलाइन अर्ज, सेल्फ डिक्लेरेशन सर्व स्वीकारण्याचे प्रशासनाला निर्देश.**
- **प्रत्येक गावामध्ये ग्राम समिती तर शहरात वार्ड समितीने शिबिर आयोजित करावे.**

**नांदेड दि. जुलै : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही समाजातील सर्व घटकांसाठी आहे. यातून एकही पात्र महिला लाभार्थी सुटणार नाही याची काळजी गाव स्तरावर ग्राम समितीने तर शहरात वार्ड समितीने घ्यावी. तसेच यावर जिल्हा प्रशासनाने नियंत्रण ठेवावे, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे.**

राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरणाच्या, आणि ग्रामीण व शहरी भागातील गरीब महिलांच्या आर्थिक विकासाच्या या महत्त्वपूर्ण योजनेला सर्व स्तरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. सर्व समाज घटकातील गरीब, गरजू, महिला या आर्थिक सक्षमीकरणातून आर्थिक स्वातंत्र्य अनुभवणार आहे. राज्य शासनाने या योजनेच्या प्राथमिक अंमलबजावणीत आलेल्या अनुभवावरून अधिक सोपी व सुलभ अशी अर्ज स्वीकारण्याची पद्धत तयार केली आहे. १२ जुलै रोजी काही सुलभ पद्धती नव्या शासन निर्णयात सुचविण्यात आलेल्या आहे. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. यंत्रणेने सर्व नवीन बदल लक्षात घेऊन कार्यरत व्हावे,असे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

नांदेड जिल्ह्यामधील सर्व समाज घटकातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी हे महत्त्वाचे पाऊल आहे. योजना कायमस्वरूपी असून दीर्घकाल चालणार आहे. या योजनेसाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे योजनेच्या बाबतीत चुकीच्या नकारात्मकता पसरवणाऱ्या बाबींकडे दुर्लक्ष करून सर्व जाती-जमातीतील महिलांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनात व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या सहभागात या योजनेच्या अंमलबजावणीच्या अतिशय उत्तम काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबतचा नियमित आढावा आपण घेत असून जिल्ह्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही याची काळजी घेण्याची निर्देश आपण दिले असल्याची त्यांनी सांगितले आहे.

सर्व घटकातील, सर्व पक्षातील, तसेच सामाजिक क्षेत्रातील सर्व नागरिकांनी आपापल्या घरातील गरीब,गरजू , पात्र महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आलेल्या या योजनेमध्ये सहभागी होण्यास मदत करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. महिन्याला दीड हजार रुपये, वर्षाला १८ हजार रुपये आपल्या घरातील महिलेला मिळणार आहे. त्यामुळे प्रत्येक पुरुषाने पात्र ठरणाऱ्या महिला भगिनींना या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी प्रवृत्त करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## भोई समाजाच्या मागण्यांसाठी आमदार केराम यांचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे

**किनवट, दि.१३ (प्रतिनिधी) : भोई समाजाने आपल्या हलाखीच्या परिस्थिती बाबत आ.केराम यांना दिलेल्या निवेदनाच्या आधारे येथील आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्यावतीने लेखी निवेदन सादर करीत भोई समाजाने केलेल्या मागण्यांचा सहानुभूती पुर्वक विचार करून त्यांची पूर्तता करण्यासाठी विनंती केली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, भोई समाज हा भटक्या जमात प्रवर्गातील असून, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्यामुळे, अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहे. भोई समाज नांदेड जिल्हयासह राज्यातही मोठ्या प्रमाणात वास्तव्य करीत असून, मासेमारी व मोलमजुरी शिवाय उदरनिर्वाहाचे इतर कुठलेही साधन त्यांना उपलब्ध नसल्यामुळे,



अतिशय दारिद्रयपूर्ण गरीबीचे जीवन जगत आहे. हा समाज बहुसंख्येने अशिक्षित असल्यामुळे अज्ञानापोटी शासनाच्या विविध योजनेपासून वंचित व दुर्लक्षित ठरलेला आहे. या समाजाला शासनाकडून काही योजना व मूलभूत हक्क मिळण्यासाठी त्यांनी काही मागण्या केल्या असून, त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी माझीसुद्धा विनंती असल्याचे आ.केराम यांनी नमूद केले आहे. भोई समाजाच्या प्रमुख मागण्यांमध्ये भोई समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, नॉन क्रीमीलेयर ची अट रदद करावी, नांदेड येथील चिखलवाडी परिसरात भोई गल्ली झोपडपट्टीचे पुनर्वसन करावे. मत्स्य व्यावसायिकांचा दि. ०३ जुलै २०१९ चा शासन निर्णय कायम ठेवण्यात यावा, भोई समाजासाठी प्रत्येक तालुक्यात मच्छीमार्केट साठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून बांधकाम करून देण्यात यावे.मच्छीमारांना किसान कार्डद्वारे कर्ज उपलब्ध करून द्यावे, तसेच कायम स्वरूपी घरकुल मिळण्याची व्यवस्था व्हावी आणि भोई समाजासाठी सभागृह उभारणीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी अशा रास्त व जगण्यासाठी अत्यावश्यक मागण्या त्यांनी केलेल्या आहेत.




# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आता निकष झाले सोपे; ऑफलाईनही अर्ज स्वीकारणार

राज्यातील महिलांचे आरोग्य व पोषण आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विविध योजना शासनाच्यावतीने राबविण्यावर भर देण्यात येत आहेत. राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंर्त्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना योजना सुरु केली आहे. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेत नांदेड जिल्ह्यात एकटया ग्रामीण भागात कालपर्यंत ४८ हजारावर अर्ज दाखल झाले आहेत. तसेच जिल्ह्यात प्रत्येक तालुकानिहाय, वार्डनिहाय, गावनिहाय अर्ज भरून घेण्यासाठी प्रशासनाच्या पातळीवर मेळावे, कॅम्प आयोजित करण्यात येत आहेत. आता या योजनेत अर्ज भरण्याची सुविधा अत्यंत सुलभ झाली असून शासनाने कागदपत्रातील निकष व अटीमध्ये शिथीलता दिली असून त्यामुळे कमीत कमी कागदपत्र व निकषामध्ये या योजनेत सहभागी होता येणार आहे.

**या योजनेचा उद्देश :**

राज्यातील महिला व मुलींना परेशा सोयी सविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना देणे. त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे. राज्यातील महिला स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे. राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरणास चालना देणे. महिला आणि त्यांच्यावर अवलंबन असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे.

**योजनेचे स्वरूप :**

पात्रता कालावधी दरम्यान प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) सक्षम बँक खात्यात दरमहा १५०० रुपये इतकी रक्कम दिली जाईल. तसेच केंद्र/ राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे रु.१५००/- पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येईल. वर्षासाठी ही रक्कम १८ हजार होत आहे.

**योजनेचे लाभार्थी :**

महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहित महिला.

**लाभार्थ्यांची पात्रता :**

लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे आवश्यक आहे. राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहित महिला. किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यत. लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पोस्टातील बँक खाते ग्राह्य धरण्यात येणार आहे.

**अपात्रता :**

ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष रुपयांपेक्षा अधिक आहे. ज्याच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. तथापि, बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले तथा स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी पात्र ठरतील. ज्या लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेद्वारे दरमहा १५०० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचा लाभ घेतला असेल. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार, आमदार आहे. ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड, कॉर्पोरेशन, बोर्ड, उपक्रमाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक सदस्य आहेत. ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन आहे ही अपात्रतेची अट वगळण्यात आली आहे. ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत ते या योजनेत अपात्र ठरतील.



**आवश्यक कागदपत्रे:**

१. योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.

२. लाभार्थ्याचे आधार कार्ड.

३. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (लाभार्थी महिलेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या महिलेचे १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/ प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे) परराज्यात जन्म झालेल्या महिलेने महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषासोबत विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचे जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे, याशिवाय महिलेच्या पतीचे पतीचे १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड व १५ वर्षापूर्वीचे मतदान कार्ड देखील ग्राह्य धरण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. नवविवाहित पत्नीचे नाव रेशन कार्ड वर नसल्यास मॅरेज सर्टिफिकेट व पतीचे रेशन कार्ड दाखवता येईल.

४. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार लाखापर्यत असणे अनिवार्य आहे. तथापि, पिवळे व केशरी रेशनकार्ड धारकांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात येत आहे.)

५. बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत.

६. पासपोर्ट आकाराचा फोटो.

७. रेशनकार्ड.

८. योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पोस्टातील बँक खाते ग्राह्य धरण्यात येणार आहे. या योजनेत ऑफलाईन अर्जावरील लाभार्थी महिलेच्या फोटोचा फोटो काढून तो ऑनलाईन अर्ज दाखल करण्यासाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे.

**कशी होते लाभार्थी निवडः-**

लाभार्थ्यांची पात्रता अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, मुख्यसेविका, सेतू सुविधा केंद्र, ग्रामपंचायत, ग्रामसेवक, वार्ड अधिकारी यांनी खातरजमा करून ऑनलाईन प्रमाणित केल्यांनतर लाभार्थ्यांचा अर्ज सक्षम अधिकारी म्हणजेच संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे व अंतिम मंजूरी देण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीकडे येईल.

**नियंत्रण अधिकारी:**

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे हे या योजनेसाठी नियंत्रण अधिकारी राहतील. तसेच आयुक्त, एकत्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे सहनियंत्रण अधिकारी राहतील.

**अर्ज करण्याची प्रक्रिया-**

योजनेचे अर्ज पोर्टल, मोबाइलपद्वारे, सेतू सुविधा केंद्राद्वारे ऑनलाईन भरले जाऊ शकतात.

१. पात्र महिलेस ऑनलाईन अर्ज करता येईल.

२. ज्या महिलेस ऑनलाईन अर्ज सादर करता येत नसेल, त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा अंगणवाडी केंद्रात, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी, ग्रामीण, आदिवासी, ग्रामपंचायत, वार्ड) सेतू सुविधा केंद्र येथे उपलब्ध असतील.

३. भरलेला फॉर्म अंगणवाडी केंद्रात, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी, ग्रामीण, आदिवासी) सेतू सुविधा केंद्र मध्ये नियुक्त कर्मचाऱ्यांद्वारे ऑनलाईन प्रविष्ट केला जाईल आणि प्रत्येक यशस्वीरित्या दाखल केलेल्या अर्जासाठी यथायोग्य पोच पावती दिली जाईल.

४. अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया विनामुल्य आहे.

५. अर्जदार महिलेने स्वतः उपरोक्त ठिकाणी उपस्थित राहणे आता आवश्यक नाही. मात्र अर्जासोबत फोटो आवश्यक असेल. यामुळे ई-केवासी (E-KYC) करता येईल. यासाठी महिलेने

६. कुटुंबाचे पूर्ण ओळखपत्र (रेशनकार्ड)

७. स्वतःचे आधार कार्ड आणणे आवश्यक आहे.

**तात्पुरत्या यादीचे प्रकाशन :-**

अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पात्र अर्जदाराची तात्पुरती यादी पोर्टल/ पवर जाहीर केली जाईल, त्याची प्रत अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत, वॉर्ड स्तरावरील सूचना फलकावर देखील लावण्यात येईल.

**आक्षेपांची पावती :-**

जाहीर यादीवरील हरकत पोर्टल, पद्वारे प्राप्त केल्या जातील. याशिवाय अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका, सेतू, सुविधा केंद्र यांचेमार्फत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी हरकत, तक्रार नोंदवता येईल. लेखी (ऑफलाईन) प्राप्त झालेल्या हरकत, तक्रार रजिस्टरमध्ये नोंदविल्या जातील आणि ऑनलाईन अपलोड केल्या जातील. पात्र लाभार्थी यादी जाहीर केल्याच्या दिनांकापासून ५ दिवसापर्यंत सर्व हरकत, तक्रार नोंदविणे आवश्यक आहे. या हरकतीचे निराकरण करण्यासाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समिती गठित करण्यात येईल.

**अंतिम यादीचे प्रकाशन :-**

गठीत समितीमार्फत प्राप्त हरकतीचे निराकरण करण्यात येऊन, पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार केली जाईल. पात्र, अपात्र लाभार्थ्यांची स्वतंत्र यादी अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत, वॉर्ड स्तरावर, सेतू सुविधा केंद्र, तसेच पोर्टल, पवर जाहीर केली जाईल. पात्र अंतिम यादीतील महिला मृत झाल्यास सदर महिलेचे नाव लाभार्थी यादीतून वगळण्यात येईल.

**लाभाच्या रक्कमेचे वितरण :-**

प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) सक्षम बँक खात्यात, पोस्टातील बँक खातेही चालेल. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत रक्कम जमा केली जाईल.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, पैशाची मागणी केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या दिल्या आहेत. या संपूर्ण प्रक्रीयेवर जिल्हाधिकारी लक्ष ठेवून आहेत. तसेच दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाही अशा सक्त सूचनाही शासनाकडून देण्यात आल्या आहेत. तसेच या योजनेसाठी नाव नोंदणी, अर्ज करणे आदी कामासाठी होणारी गर्दी लक्षात घेवून अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यत वाढविण्यात आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक सेतू केंद्रावरील अर्जाचे शुल्क निर्धारित केले असून अधिकचे शुल्क आकारल्यास तक्रार करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

**अलका पाटील, उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय नांदेड**

---

## खास महिलांसाठी...

## मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना

महाराष्ट्रातील माता-भगिनी आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिलांच्या आरोग्य आणि पोषणाची हमी घेणार आहे.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंर्त्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे.

राज्यातील महिला व मुलींना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर रोजगार निर्मितीस चालना देणे, महिलांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरणास चालना देणे, महिला व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र राहिलेल्या तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) सक्षम बँक खात्यात दर महिन्याला १,५०० रूपये दिले जाणार आहे. तसेच केंद/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे १,५०० पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येणार आहे. याचाच अर्थ त्या महिलेला १ वर्षात १८ हजार रूपये मिळणार आहेत.

या योजनेचा लाभ राज्यभरातील अधिकाधिक महिलांना घेता यावा यादृष्टीने आपल्या शासनाने अनेक अटी शिथिल करत या योजनेची प्रक्रिया अधिक सलभ केली आहे.या योजनेअंतर्गत आता २१ ते ६५ या वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिलांना तसेच कटुंबातील एका अविवाहित महिलेला दरमहा १,५०० रूपये दिले जाणार आहेत. यामुळे राज्यातील अनेक महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरायचा आहे. जिथे अशक्य आहे, तिथे ऑफलाईन अंगणवाडी सेविका, सेतू सुविधा केंद्रात अर्ज जमा करता येईल. आणि घरच्या घरी मोबाईलवरूनही नारीशक्तीदूत अँपवरून ऑनलाईन अर्ज भरता येईल.



**योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :-**

- २१ ते ६५ वर्ष वयोगटातील महिलांना लाभ.
- लाभार्थी महिला महाराष्ट्राच्या रहिवासी असणे आवश्यक.
- लाभार्थी महिलेच्या बँक खाते असणे आवश्यक.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रूपयांपेक्षा जास्त नसावे.
- पिवळे व केशरी रेशनकार्ड असल्यास उत्पन्न दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात आली आहे.
- विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परितक्त्या, निराधार आणि कुटुंबातील एका अविवाहित महिलेला लाभ.

**या योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

- योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.
- लाभार्थी महिलेचे आधार कार्ड.
- महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्रातील जन्मदाखला.
- योजनेचा लाभ मिळण्यासाठी अधिवास प्रमाणपत्र नसल्यास १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्मदाखला यापैकी ग्राह्य धरण्यात येणार आहे.
- परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील पुरुषाबरोबर विवाह केला असल्यास पतीचा जन्मदाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.
- सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंबप्रमुखाचा उत्पनाचा दाखला.
- बॅक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.
- पासपोर्ट साईजचा फोटो.
- रेशन कार्ड
- या योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

**या योजनेत अर्ज कसा करता येईल ?**

ज्या महिलेस ऑनलाईन अर्ज करता येत नसेल, त्याच्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया अंगणवाडी केंद्रात/बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये/ग्रामपंचायत/वॉर्ड/सेतू सुविधा केंद्रे येथे उपलब्ध आहे. अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/ मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र/ ग्रामपंचायत/ग्रामसेवक/ वार्ड अधिकारी यांनी ऑनलाईन प्रस्तावित केल्यावर लाभार्थी महिलेचा अर्ज सक्षम अधिकारी यांच्याकडे सादर करता येईल

अर्ज करण्याची प्रक्रिया विनामूल्य आहे.

अर्जदार महिलेने स्वतः अर्ज करताना उपस्थित राहणे आवश्यक आहे जेणेकरून तिचा थेट फोटो काढता येईल आणि ई-केवायसी करता येईल.

महाराष्ट्रातील आर्थिक दुर्बल घटकांसोबत सर्व प्रवर्गातील महिलांसाठी राज्य शासन पाठीशी उभे आहे. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना अंमलात असून महिलांना आर्थिक आधार देण्यात येत आहे.

**- वर्षा फडके- आंधळे**

वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

---

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नांदेड जिल्ह्यात ४८ हजारावर अर्ज दाखल

- **गोंधळून जाऊ नये ; प्रत्येकाच्या अर्जाला दाखल केले जाईल.**
- **आधार कार्ड नुसारच माहिती भरली जावी.**
- **नवविवाहितेनी लग्नाचे प्रमाणपत्र रेशन कार्ड सोबत जोडावे.**
- **आता फोटो ऑनलाईनच भरायची गरज नाही.**

नांदेड दि.१२ जुलै : महिला सबलीकरणाच्या दृष्टीने क्रांतिकारी पाऊल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी जिल्ह्यातील ४७ हजार ८२७ महिला भगिनींनी आपले अर्ज दाखल केले आहे. तथापि, जिल्ह्यातील सर्व पात्र महिला भगिनींना हा अर्ज भरण्याची संधी मिळणार असून गोंधळ व गडबड करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

राज्य शासनाने प्रत्येक पात्र महिलेला सुलभतेने हा अर्ज भरता यावा यासाठी या योजनेमध्ये आणखी काही बदल केले आहे. या संदर्भात आज राज्याच्या मुख्य



सचिव सुजाता सौनिक यांनी मंत्रालयातून संपूर्ण महाराष्ट्राचा आढावा घेतला. नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, महिला व बालविकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा कदम यांच्यासह महिला व बालकल्याण विभाग व अन्य विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सोबतच जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील संपूर्ण यंत्रणेची आढावा बैठक घेतली असून आधार कार्ड नुसार माहिती भरण्याचे आवाहन केले आहे. नारीशक्तीदूत पमध्ये लाभार्थी महिलेचे नाव भरताना त्यांच्या आधार कार्डवर जे नाव लिहिले आहे तेच अर्जात लिहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. आधार कार्डनुसार अर्जदाराचा संपूर्ण पत्ता आणि अन्य माहिती तंतोतंत भरावी, अशी सूचना ही सर्व यंत्रणेला देण्यात आली आहे. कोणत्याही ठिकाणी यंत्रणेकडून अधिकचे कागदपत्र किंवा पैशाची मागणी करण्यात आल्यास सक्त कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

**ऑफलाईन अर्ज व फोटो ग्राह्य** गाव पातळीवर 'नारीशक्तीदूत' द्वारे ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी येत असल्याच्या तक्रारी आहेत. मात्र आता ऑफलाइन पद्धतीने ही अर्ज देता येणार आहे. याशिवाय सुरुवातीला ऑनलाइन फोटो अपलोड करणे आवश्यक होते, आता तशी आवश्यकता नाही. अर्जासोबत जोडलेले फोटो ऑनलाईन अर्जासाठी ग्राह्य धरण्यात यावे, अशी स्पष्ट सूचना करण्यात आली आहे.

**नवविवाहितेचे मॅरेज सर्टिफिकेट** ग्रामीण भागात नवविवाहितेचे लगेच रेशन कार्ड वर नाव येणे शक्य नाही.त्यामुळे नवविवाहित महिलेच्या बाबतीत तिचे नाव रेशन कार्ड वर नसेल तर विवाह नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या अशा नवविवाहित महिलेच्या पतीचे रेशन कार्ड हे उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राह्य धरण्यात यावा, असेही नव्या आदेशात म्हटले आहे. याची देखील जिल्ह्यामध्ये अंमलबजावणी व्हावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.




# थोडक्यात

## महामार्गावरील बंद पथदिवे प्रकाशणार कधी?



किनवट /प्रतिनिधी माहूर किनवट राष्ट्रीय राज्य महामार्गाच्या विस्तारीकरणाच्या वेळी दुभाजकासह स्ट्रीट लाईटची खांबे मागील एक वर्षा पूर्वी काढण्यात आली होती, तब्बल दहा महिन्यानंतर बसविण्यात आली. मात्र अद्याप पथदिवे सुरु न झाल्यामुळे ही बाब अपघाताला कारणीभूत ठरत आहे. हे पथदिवे तातडीने सुरू करण्याची मागणी किनवट शहर वासियानी केली आहे. किनवट शहरातून जात असलेला राष्ट्रीय महामार्ग आयेप्पा स्वामी मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत रात्री ११ वाजेपर्यंत सुद्धा गजबजलेला असतो, सायंकाळनंतर महामार्गावरून प्रवेश करणे अतिशय कठोण झाले आहे. जनरेटर लावून टेस्टिंग झाली, पण अडले तरी कुठे

वीजपुरवठा करण्याचे अडले तरी कुठे? हे न समजणारं कोडेच आहे. जनरेटर लावून टेस्टिंग झाली. नगरपालिकेच्या नावे मीटर घेऊन तो ताब्यात देण्यात येणार असल्याचे महामार्गाचे उपअ- भियंता यांनी ५ महिन्यांपूर्वी सांगितले. पण कुठे अडले कळायला मार्ग नाही? आतातरी दिवे सुरू होतील का? असा प्रश्न विचारला जात आहे. हे खांब व पथदिवे शोभेची वस्तू बनले आहेत. शहरात येणाऱ्या प्रत्येक वाहनाला शहर आले की नाही, असा अनुभव येत आहे. महामार्गाचे काम पूर्ण होऊनही दिवे बंदच असल्याने किनवटला वालीच राहिला नाही, अशी चर्चा होत आहे.रस्त्यावर ठिय्या मांडून बसलेली मोकाट जनावरे व रस्त्याच्या लगत अनधिकृत चांबून राहणारी वाहने आणि हातगाडे या मुळे वाहन चालकांना संकटाचा सामना करावा लागत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने सरपटणाऱ्या प्राण्याची भीती सुद्धा असते अशात पथदिवे बंद असल्याने पायदळ चालणाऱ्या जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. त्यामुळे पथदिवे तत्काळ सुरू करावे अशी मागणी होत आहे.पथदिवे चालू करण्याकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष का ? असा संतप्त सवाल नागरिकांतून विचारला जात आहे.मुख्य रस्त्यावरील पथदिवे लवकरात लवकर चालू करण्यात यावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## प्रलंबित, तडजोडपात्र प्रकरणासाठी २१ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ पर्यंत विशेष लोकअदालत सप्ताह

**मुंबई, दि. १२: लोकअदालतीद्वारे पक्षकारांना जलद गतीने मिळणारा दिलासा लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याकडे प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी विशेष लोकअदालत सप्ताहाचे आयोजन केले आहे. ही विशेष लोकअदालत २९ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ या दरम्यान होणार आहे.**




लोकअदालतीमध्ये तडजोडीद्वारे निकाली निघालेल्या प्रकरणांमुळे प्रकरणातील पक्षकारांसोबत शासन आणि समाज या दोन्ही घटकांना मोठा लाभ प्राप्त झाला आहे. लोकअदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले आहे. न्यायालयातील तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे सामंजस्यातून तडजोडीद्वारे निकाली काढण्याकरिता लोकअदालत हे प्रभावी माध्यम म्हणून समोर आलेले आहे. यामळे विशेष लोकअदालती मार्फत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे लोकअदालतीच्या माध्यमातून निकाली काढण्यात येणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने लोकअदालतमध्ये ठेवलेल्या प्रकरणांची यादी https://legalservices.maharashtra.gov.in/Site/Upload/Pdf/MAHARASHTRA.pdf या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी ज्यांची प्रकरणे या यादीमध्ये असतील त्यांनी स्वतः अथवा वकिलांमार्फत महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई किंवा संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधून याचा लाभ पक्षकारांनी घ्यावा, असे आवाहन सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी केले आहे.

## शेतात लोंबकाळलेल्या विजेच्या तारेचा स्पर्श होऊन नातवाचा मृत्यू तर आजोबा जखमी

**किनवट/प्रतिनिधी- शेतातील पोल वाकून लोंबकाळलेल्या विद्यूत वाहक तारांचा स्पर्ष होऊन पार्डी खुर्द येथिल संभाजी कांदे (वय वर्ष ६६) आजोबा जखमी तर बोधडी खुर्द येथिल नातू पवन रामेश्वर मुंडे (वय वर्ष २२) या तरूणाचा जागीच होरपडून मृत्यू झाला. सदर दुर्घटना १२ जुलै रोजी पेन्दा गावच्या शिवारात घडली. या संतापजनक आणि ह्दयाचे ठोके वाढवर्णाया घटनेला जबाबदार असर्णाया लाईनमनसह संबंधितांवर कर्तव्यकसूरतेसह चक्क मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हायला हवा अशी संतप्त नागरीकांची मागणी आहे. या घटनेपेक्षाही अनेकांचा जीव घेणारी घटना प्रधानसांगवी गावातील मुख्य चौकात घडण्याची भिती गावकर्यांनी व्यक्त केली. लोकवर्दळ असलेल्या चौकातील एक पोल बुडातून तुटलेला तर दुसरा पूर्ण वाकलेला असून कोणत्याही क्षणी कोसळू शकतो. असे असतांना देखिल महावितरण कम्पनी प्रशासन लापरवाह करीत असेल तर त्यांच्यावरही कारवाई व्हावी अशी मागणी करण्यात येत आहे.**




बोधडी खुर्द येथिल पवन मुंडे हा त्यांचे पार्डी खुर्द येथिल आजोबा (आईचे वडील) संभाजी कांदे यांच्या पेन्दा/नागनाथदेव येथिल शेतात डवरे धरण्यासाठी गेले होते. शेतातील पोल वाकून विद्यूत वाहक ताराही मानसाच्या डोक्याला लागतील इतक्या लोंबकाळलेल्या आहेत. त्या तारांना आजोबा कांदेच्या मानेला स्पर्ष झाल्याने ते दूरवर फेकल्या जाऊन बचावले पण दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार चालू असल्याचे सूत्र सांगतात. तर नातू पवन मुंडे हा विद्यूत तारांना चितकल्याने त्याचा जागीच होरपळून मृत्यू झाल्याची भयावह घटना घडल्याचे वृत्त आहे. लोंबकाळलेल्या तारांविषयी महावितरणच्या बोधडी बु.च्या कार्यालयाला वारंवार कळवले मात्र त्यांनी दखल घेतलेली नाही. अखेर पवन मुंडेला जीव गमवावा लागला. या प्रकरणी संबधित दोयी विरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी संतप्त लोकांची मागणी आहे. महावितरण प्रशासन यावर काय पाऊल उचलणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

तर दुर्सया बाजूने गोकुंदा ग्रामिण विज वितरण कम्पनी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रधासांगवीतील मुख्य चौकात एक पोल बुडातूनच तुटलेला आहे. केवळ विद्यूत वाहक तारांच्या मदतीने उभा आहे. अवघ्या विस फुटाच्या अंतरावरील दुसरा पोल नव्वदअंशाचा वाकलेला आहे. कोण्या दिवस्यी कोसळेल याचा नेम नाही. लोकवर्दळीचा हा गावातील मुख्य चौक आहे. ऑटोंचा थांबा, किराणा दुकानं याच चौकात आहेत. अशा ठिकाणी विद्यूत असतांना वाहकतारांसह एक पोल कोसळलातर तो दुर्सया पोलला घेऊन पडेल. त्यातून किती जीवितहानी आणि विविध प्रकारची हानी होईल ? याबद्धल गावकर्यांनी चिंता व्यक्त केली. दोन महिन्यापासून नविन सिमेंटपोल आणून ठेवलेत मात्र यंत्रणा पोल बदलायला तयार नाहीत. उलटपक्षी हेच पोल लाईनमन दुसरीकडे लांबवायच्या तयारीत होता. परंतू माजी उपसरपंच ब्रम्हाजी केंद्रेसह कांही नागरीकांच्या सजगतेमुळे पोल फेकून लाईनमनला पळ काढावा लागल्याचे कांहींनी सांगितले.




**किनवट : किनवट तालुक्यात वाळूचे अवैधरित्या उत्खनन व तस्करी करणा-या विरोधात महसूल प्रशासनाने धडक कारवाईची मोहीम हाती घेवून वाळू घाटांवरून होणारी वाळूची तस्करी रोखण्याचे काम हाती घेतले आहे. दि.०८ जुलै रोजी सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली व किनवटच्या तहसिलदार शारदा चोंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मांडवी येथे अंदाजे १२ ब्रसचे (१६ टायरचे) एक हायवा अवैध रेती वाहतूक करताना पकडून पोलीस स्टेशन मांडवी येथे लावण्यात आला.सदर पथकात विनोद सिंगेवार (मं.अ.), तलाठी पवन शिरगुरवार, विश्वास फड, माणिक बोधगिरे, सचिन भालेराव, आदिनाथ डुकरे, गौतम पांढरे हे होते.**

## नांदेड मध्ये भूकंपाचे सौम्य धक्के ; नागरिकांनी घाबरून जाऊ नये : जिल्हाधिकारी

**नांदेड दि. १० : हिंगोली शहराचा केंद्रबिंदू असणाऱ्या आज सकाळी झालेल्या भूकंपाची रिश्टर स्केलवर ४.५ नोंद झाली आहे. हा अति सौम्य भूकंप असून नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.दि. १० जुलै २०२४ रोजी नांदेड शहर व नांदेडमधील सर्वच तालुक्यातून सकाळी ०७:१४ वाजता भूकंपाचे धक्के जाणवले असून या भूकंपाची तीव्रता रिष्टर स्केल वर ४.५ नोंदविण्यात आलेली आहे.**

स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील भूगर्भशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ व भूकंप संदर्भात अभ्यास करणाऱ्या भूकंपशास्त्र केंद्रीय विभागाकडून अधिक अभ्यास केला जात आहे.

भूकंपचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील रामेश्वर तांडा गावात असून नांदेड व परभणी जिल्ह्यात या भूकंपाचे धक्के जाणवले असल्याची माहिती नियंत्रण कक्षास प्राप्त झालेली आहे. नांदेड जिल्ह्यात जाणवलेले धक्के सौम्य स्वरूपाचे असून कुठेही नुकसान



झालेले नाही. तरी नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. तसेच गावात ज्या लोकांच्या घराचे छत पत्र्याचे आहे व त्यांनी पत्र्यावर आधारासाठी दगड ठेवले आहेत त्यांनी त्वरित दगड काढून घ्यावेत, असे आवाहन अभिजीत राऊत यांनी केले आहे.

## नवीन अत्याधुनिक बस उपलब्ध करुन द्या!

### प्रदेशाध्यक्ष आमन कुंडगीर यांच्या मागण्यांची मुख्यमंत्र्यांकडून दखल

किनवट, ता. ७ : दिवसेंदिवस प्रवाशांची वाढती लोकसंख्या पाहता किनवट आगारात नवीन अत्याधुनिक बस उपलब्ध करून देण्याची मागणी धनगर समाज संघर्ष समितीचे युवक प्रदेशाध्यक्ष आमन कुंडगीर आमदार भिमराव केराम यांना केली होती. केराम यांनी विधानभवनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेवून कुंडगीर यांच्या मागण्यासंदर्भात मुख्यमंत्यांना निवेदन देवून नवीन बस उपलब्ध करून देण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीची संवेदशील मुख्यमंत्री शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाच्या व्यावस्थापकीय संचालकांना तात्काळ प्रस्ताव दाखल करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे नवीन बस मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

साडेतीन पिठापैकी एक पुर्णपीठ असलेल्या रेणुका देवीचे दर्शन घेण्यासाठी राज्यभरातून भावीक मोठ्या भक्ती भावाने किनवट रेल्वेस्टेशनला उतरतात आणि बसने माहुरकडे प्रस्थान करतात. त्यामुळे किनवट आगाराला मोठा महसूल जमा होतो. अनेक वर्षांपासून किनवट आगाराला नवीन बस मिळाल्या नाहीत. जुन्या, मुदत संपलेल्या बसची अत्यंत बिकट अवस्था झाली आहे. त्यामुळे प्रवासादरम्यान बस खराब होण्याचे प्रमाणही वाढले आहे. प्रवासादरम्यान खराब झाल्यामुळे बसमुळे शालेय विद्यार्थी आणि प्रवाशांना गौरसोय सहन करावी लागते. ही अंत्यत चिंतेची बाब लक्षात घेऊन कुंडगीर यांनी नवीन बस उपलब्ध करून देण्याची मागणी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास,



किनवट : नवीन अत्याधुनिक बस उपलब्ध करून देण्याचे निवेदन आमदार भिमराव केराम यांना देण्यात आले यावेळी उपस्थीत डावीकडून प्रदेशाध्यक्ष आमन कुंडगीर, माजी नगराध्यक्ष आनंद मचेवार, अनंत बनसोडे, प्रशांत मोरे.

पंचायतराज तथा पालकमंत्री गिरिश महाजन, माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे, आमदार भिमराव केराव यांना केली आहे. तसेच आदिवासी किनवट तालुका हा अत्यंत डोंगराळभाग असल्यामुळे सार्वजनिक वाहतूकीची साधने अत्यल्प आहे. त्यामुळे प्रवाश्यांना जीव मुठीत घेवून खासगी वाहनांनी भावीकांना प्रवास करावा लागतो. त्यासाठी किनवट ते पंढरपूर, शेगाव अशा तिर्थस्थळांना जाण्यासाठी नवीन बस सुरु करण्यात यावे असेही निवेदनात म्हटले आहे.

## भाजपच्या कार्यकर्त्यांनी विकासात्मक कामे घराघरात पोहोचविण्यासाठी जोमाने कामाला लागावे-प्रवीण साले



**किनवट प्रतिनिधीः पूर्णतः हताश झालेल्या विरोधकांना कोणताही पर्याय उरला नसल्याने त्यांनी लोकसभेच्या निवडणुकीत नेरेटीवचा वापर केला. मोदीचे सरकार संविधान बदलणार असा अपप्रचार करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला परंतु भाजपाच्या कार्यकर्त्यांनी विरोधकांच्या या नेरेटिव्हला न घाबरता निर्भीडपणे पक्षाची विचारधारा, ध्येयधोरणे व विकासात्मक कामे घराघरात पोहोचविण्यासाठी जोमाने कामाला लागावे असे आवाहन मराठवाडा संयोजक प्रवीण साले यांनी किनवट येथे केले आहे.**

लोकसभेच्या निवडणुका संपन्न होताच आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाने जय्यत तयारी सुरू केली असून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त प्रत्येक जिल्ह्यात बूथ सक्षमीकरण व मतदार यादी पुनर्नरीक्षण संदर्भात बैठका नियोजन व रणनीती ठरविण्याचे काम युद्धपातळीवर सुरु केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून ६जुलै २०२४ रोजी गोकुंदा येथील गोपीकिशन मंगल कार्यालयात भाजपाची व्यापक बैठक संपन्न झाली त्यावेळी मार्गदर्शन करताना प्रवीण साले बोलत होते.

या बैठकीस जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख जिल्हा संयोजक बाबुराव केंद्रे जिल्हा सरचिटणीस प्राध्यापक किशन मिरासे जिल्हा उपाध्यक्ष नागनाथ कराड सर अविनाश राठोड भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष संध्याताई राठोड किनवट विधानसभा संयोजक गोविंदराव आंकुरवाड युवक आघाडीचे नांदेड जिल्हाध्यक्ष संदीप राठोड किनवट तालुका अध्यक्ष बालाजी आलेवार,माहूर तालुका अध्यक्ष श्रीकांत घोडेकर महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष उषाताई धात्रक आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रारंभी डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुष्पपूजन करून अभिवादन करण्यात आले.

प्रवीण साले पुढे म्हणाले की देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने महिला व दुर्बल घटकाला प्राधान्य देऊन सर्वांगीण विकासाचा पाया रचला.कलम ३७० हटून जम्मू-काश्मीर मुक्त केले तर आयोध्यामध्ये प्रभू रामचंद्राचे भव्य मंदिर उभारून करोडो हिंदू बांधवांचे स्वप्न साकार केले.उज्वला गॅस योजना, पंतप्रधान घरकुल योजना शेतकरी सन्माननिधी सारख्या महत्वकांक्षी योजनामुळे गोरगरीब दुर्बल घटकाचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावला आहे.भारत देशाची जागतिक महासत्तेकडे सुरू असलेली वाटचाल विरोधकांच्या चांगलीच जिव्हारी लागली आहे. महायुतीच्या विजयाची घोडदौड रोखण्याचा कोणताही पर्याय शिल्लक नसल्याने लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांनी जाणीवपूर्वक नेरेटिव्हचा वापर केला. हे सरकार पुन्हा सत्तेत आले तर संविधान धोक्यात येईल असा अपप्रचार व दिशाभूल करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला. परंतु भाजपाच्या कार्यकर्त्यांनी विरोधकांच्या नेरेटीव न घाबरता निर्भीडपणे पक्षाची विचारधारा, ध्येयधोरणे मोदी सरकारची भूतपूर्व विकासकामे घराघरात पोहोचविण्यासाठी परिश्रम घ्यावे असे आवाहन प्रवीण साले यांनी केले आहे.

जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांनी बूथसक्षमीकरण व मतदारयादीतील उनिवाबद्दल माहिती दिली. शक्ती केंद्रप्रमुख, बूथप्रमुख यांनी स्थलांतरी मतदार, मयत व नव्याने समाविष्ट मतदारांची वेळोवेळी पडताळणी करावी तसेच यादीतील चुका संदर्भात तात्काळ तहसील कार्यालयात तक्रार दाखल करावी. बूथकमिटीने सर्वजाती समूहातील सक्रिय कार्यकर्त्यांना समाविष्ट करून घ्यावे व काही फेरबदल अपेक्षित असल्यास तसे वरिष्ठ पदाधिका-यांना कळवावे. जो निष्ठापूर्वक व प्रामाणिकपणे काम करेल अशा कार्यकर्त्यांना मोठ्या पदावर काम करण्याची संधी देण्यात येईल असे आश्वासन देशमुख यांनी कार्यकर्त्यांना दिले आहे.

प्रस्ताविक भाषणातून जिल्हा संयोजक बाबुराव केंद्रे यांनी लोकसभा निवडणुकीतील आढावा तसेच बूथस्तरावर वरील कार्यकर्त्यांना उद्भवणा-या अडीअडचणी मांडल्या. नांदेड जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी व नियोजन करून विधानसभेत विजयी पताका फडकविणार असल्याचे सांगितले आहे. या बैठकीला भाजपचे दिनकर चाडावार, संदीप केंद्रे, प्रदीप एडके, श्रीनिवास नेम्मानीवार, अजय चाडावार, राघू मामा, दत्ता आडे, कपिल करेवाड, डॉ नामदेव कराड, विवेक केंद्रे, बालाजी भिसे, स्वागत आयनेनीवार, बाळकृष्ण कदम, पपू अरमाळकर, संतोष कनाके,दत्ता दोनकेवार, सागर पिसारीवार, रमेश बोड्डेवाड, जोतिराम राठोड यांच्यासह किनवट माहूर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे विविध आघाड्यांचे आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते शक्ती केंद्रप्रमुख व बूथप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एक रुपयात पीक विमा योजना काढण्याचा आज शेवटचा दिवस

### शेतक-यांनी तातडीने लाभ घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

नांदेड, दि. ११ जुलै :- केवळ १ रूपयामध्ये शेतातील पिकाचा पीक विमा काढला जातो. केंद्र व राज्य सरकार मोठ्या प्रमाणात यासाठी आर्थिक तरतूद करते. त्यामुळे जिल्ह्यातील ज्या शेतक्यांनी आपले पीक संरक्षित केले नसतील त्यांनी तातडीने पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. यासंदर्भात आज जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाऊसाहेब ब्हाटे यांनी व्हिडिओ संदेश जारी करतांना स्पष्ट केले की, गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी शेतक्यांनी पीक विमा योजनेचा लाभ यावर्षी घेतला आहे. यावर्षी ९७ टक्के पाऊस आतापर्यंत आला असून पिके संरक्षित करणे आवश्यक आहे. गेल्यावर्षी पीक विमा योजनेमध्ये ११ लाख शेतक्यांनी भाग घेतला होता. मात्र यावर्षी गुरूवार ११ जुलै पर्यंत ७ लाख ४५ हजार शेतक-यांनीच पीक विमा योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेतून नांदेड जिल्ह्यामध्ये ४०० कोटीपेक्षा अधिक लाभ शेतक्यांना झाला आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी लक्षात घेता प्रत्येक गावागावात यासंदर्भात जनजागृती व्हावी. केवळ १ रूपयामध्ये सेवाकेंद्र, सेतूकेंद्र व बँकेत जाऊन प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ घेता येतो. शेवटच्या तारखेची वाट बघू नका.

पीक विमा योजनेसाठी १५ जुलै शेवटची मुदत आहे. परंतू शेवटच्या तारखेला पीक विमा भरतांना पोर्टलवर येणाऱ्या अडचणी लक्षात घेता त्यापूर्वीच आपल्या सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. या योजनेमध्ये वेळेला महत्त्व असते त्यामुळे मुदतवाढ दिली जाणार नाही, हे लक्षात घेऊन सर्व शेतक-यांनी याबाबत तातडीने पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## विधानपरिषदेच्या ११ जागांचे निकाल जाहीर

मुंबई, दि. १२ : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक जाहीर केली होती. महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे निवडून दिल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या ११ सदस्यांच्या रिक्त होणाऱ्या जागांकरिता आज १२ जुलै २०२४ रोजी मतदान व मतमोजणी करण्यात आली.

या निवडणुकीत श्रीमती पंकजा गोपीनाथराव मुंडे, योगेश कुंडलिक टिळेकर,डॉ.परिणय रमेश फुके,अमित गणपत गोरखे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, कृपाल हिराबाई बालाजी तुमाने, भावना पुंडलिकराव गवळी, शिवाजीराव यशवंत गर्जे, राजेश उत्तमराव विटेकर, सदाभाऊ रामचंद्र खोत आणि मिलिंद केशव नार्वेकर हे११ सदस्य विजयी झाले आहेत, अशी घोषणा विधानमंडळ सचिवालयाचे सचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.जितेंद्र भोळे यांनी केली.

विधानपरिषद सदस्य डॉ. मनीषा श्यामसुंदर कायंदे, विजय विठ्ठल गिरकर, अब्दुल्ला खान अ.लतीफ खान दुर्राणी, नीलय मधुकर नाईक, ड. अनिल दत्तात्रय परब,रमेश नारायण पाटील, रामराव बालाजीराव पाटील, डॉ. वजाहत मिर्झा अथेर मिर्झा, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, महादेव जगन्नाथ जानकर आणि जयंत प्रभाकर पाटील हे २७ जुलै २०२४ रोजी विधान परिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून ही निवडणूक घेण्यात आली होती.

**नोटीस**

संस्थेच्या तमाम सभासद ठेवीदार कर्जदार व हितचिंतक यांना या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमची शाखाः किनवट या शाखेमध्ये पिग्मी कलेक्शन करीत असलेले एजंट नाव

**अश्विनी लखुळ करपे**

**रा. धनगर जवळका ता.पाटोदा जि. बीड.**

यांनी संस्थेकडे एजंट या पदाचा राजीनामा देण्याबाबतचा अर्ज दिलेला आहे. तरी सदर एजंट यांच्या दैनंदिन बचत खाते संदर्भात काही तक्रार अथवा अडचण असल्यास हि नोटीस प्रसिध्द झालेल्या दिवसापासुन आठ दिवसाच्या आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह संस्थेच्या मुख्य कार्यालयात अहमदनगर येथे संपर्क साधावा. आठ दिवसाच्या आत संस्थेच्या मुख्य कार्यालयास दैनंदिन बचत खात्या संदर्भात कुठलिही तक्रार प्राप्त न झाल्यास सदर एजंटचा राजीनामा स्विकारून त्यास एजंट या पदाच्या जबाबदारीतुन मुक्त करण्याचा अधिकार संस्थेस राहील व उशिरा आलेल्या दैनंदिन बचत खाते संदर्भातील तक्रारीचा विचार केला जाणार नाही व यांनतर सदर व्यक्तीबरोबर केलेल्या कोणत्याही आर्थिक व्यवहारास संस्था जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे.

**श्री रेणुकामाता मल्टी स्टेट को-ऑप.**
**अर्बन क्रेडिट सो. लि. अहमदनगर**
तर्फे
**व करीता मोरे हरिश्चंद्र अंबादास (जनरल मॅनेजर)**

**टी.सी.हरवली आहे**

**माझी चव्हाण मो.समीर मो.गफुर नावाची सरस्वती विद्यामंदिर प्राथमिक शाळा,किनवट येथून घेतलेली इयत्ता ६ वी पासची मूळ टी.सी. बस प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधून आणून द्यावे.**
**संपर्क पत्ता : चव्हाण मो.समीर मो.गफुर, रा. किनवट जि. नांदेड**

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या आढावा बैठकीत निर्णय;
# चिमटा धरणाला ‘तुर्तास ब्रेक’

**किनवट : विदर्भ-मराठवाड्यातील ९५ गावांना विस्थापित करणाऱ्यांनी चिमटा धरणात गावे न बुडविता पाणी कसे देता येईल, याचा अभ्यास करावा व प्रकल्पाच्या बाबतीत चालू असलेले कामे बंद करावे, असे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. यावेळी आ. भिमराव केराम आ. संदीप धुर्वे, आ. नामदेवराव ससाने व निम्न पैनगंगा धरण विरोधी कृती समीतीचे पदधिकारी उपस्थीत होते.**

निम्न पैनगंगा चिमटा धरणाचे काम वेगाने सुरू झाल्यानंतर बुडीत क्षेत्रातील गावाचा रोष वाढत चालला आहे. याचा फटका लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला बसला होता. अवघ्या महिन्यावर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीतही हा मुद्दाप्रामुख्याने चर्चिविला जाऊन बाधित क्षेत्रातील आर्णी घाटंजी, महागाव उमरखेड व किनवट माहूर मतदार संघात सत्ताधारी आमदारांना निवडणुकीत अवघड होईल, असे शेतक-यांच्या भूमिकेतून दिसून येत होते. धरण विरोधी संघर्ष समिती आणि शेतकरी यांनी नुकतीच किनवट येथे आ. भिमराव केराम यांची भेट घेतली असता पावसाळी आधिवेशनात तुमची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांच्यासमवेत मुंबई येथे सकारात्मक चर्चा करून देतो, असे आश्वासन दिले त्याप्रमाणेच आजही चर्चा झाली. सत्ताधारी आमदार यांच्याकडे धरणाचे काम थांबविण्याची वारंवार विनंती केली होती, यावरून ९ जुलै रोजी धरण विरोधी संघर्ष समिती व आमदारांच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयात भेट घेऊन निम्न पैनगंगाधरण विरोधी संघर्ष समिती व शासनाचेपदाधिकारी यांच्यात बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये संघर्ष समितीच्या बाजूने आमदार भीमराव केराम, आमदार संदीप धुर्वे, आमदार नामदेवराव ससाने व संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रल्हाद पाटील जगताप, ॲड. वोकेट बालाजी येरावर, डॉक्टर बाबा डाखोरे, प्रल्हाद गावंडे, बंडुजी नाईक, गजानन डाखोरे, भगवती प्रसाद त्तितरे, गुलाब मेश्राम बंटी जोमदे कैलास खसावत, ज्योतिबा मंडलवार आदी हजर होते. यावेळी धरण का नको, या बाबतीत संघर्ष समिती व आमदारांनी भूमिका मांडली. यावेळी प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सचिव पाठक, जलसंपदा विभागाचे कोल्हे, अधीक्षकअभियंता चौधरी अधीक्षक यांची उपस्थिती होती. शेतकरी व प्रशासनाची बाजू ऐकूण घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चिमटा धरणात गावे न बुडविता पाणी कसे देता येईल, याचा अभ्यास करावा व प्रकल्पाच्या बाबतीत चालू असलेले कामे बंद करावे असे आदेश दिले. ही बैठक आयोजित करण्या संबंधी किनवट- माहूरचे आमदार भीमराव केराम यांनी उपमख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली होती, त्यावरून उपमुख्यमंत्री कार्यालय मंत्रालय मुंबई येथे सदर सकारात्मक बैठक संपन्न झाल्याने धरणविरोधी संघर्ष समिती व पुढील क्षेत्रातील शेतक्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## निम्न पैनगंगा प्रकल्प परिसरातील गावक-यांच्या समस्या सोडवाव्यात-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई, दि. ९ : निम्न पैनगंगा प्रकल्प परिसरातील गावक्यांना कोणत्याही समस्या येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. प्रकल्प उभारताना गावे बाधित न करता पाणी साठवणीच्या विविध उपाययोजना सुचवाव्यात. तसेच त्यासंदर्भात अहवाल सादर करावा. अंतिम निर्णय होईपर्यंत प्रकल्प कामाची कार्यवाही करू नये, असे निर्देश उपमख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

आज विधान भवन येथे यवतमाळ जिल्ह्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार डॉ. संदीप धुर्वे, नामदेव ससाणे, भीमराव केराम, विभागाचे अधिकारी, पैनगंगा प्रकल्प विरोधी संघर्ष समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, पैनगंगा प्रकल्प उभारणे आणि उपसा सिंचनाने होणारे फायदे यासाठी पर्यायी मार्गाबाबत सकारात्मक विचार करावा. गावांना बाधित न करता कोणत्या पद्धतीने पाणी अडवता येईल यासाठी सर्वोतोपरी विचार करून अहवाल सादर करावा. विविध उपाययोजनांचा अभ्यास करून अंतिम निर्णय होईपर्यंत तसेच जनतेला कोणत्याही समस्यांना सामोरे जावे लागू नये यासाठी प्रकल्प सुरु करण्यासंदर्भात कार्यवाही न करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

भविष्यात उद्भवणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या समस्यांचा विचार करून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सकारात्मक निर्णय करावा, अशी सूचनाही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली.

यावेळी संघर्ष समितीच्या प्रतिनिधींनी त्यांचे म्हणणे मांडले.

## माझी लाडकी बहीण योजनेचा सर्व महिलांनी लाभ घ्यावा भाजपा नेत्या संध्याताई राठोड यांचे आवाहन

**मांडवी : 'शासन 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' राबवित आहे. तेव्हा महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजप नेत्या व महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा संध्याताई प्रफुल्ल राठोड यांनी केले.**

'मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान' अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या या योजनेला महिलांच्या सर्व स्तरातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. अत्यंत सोप्या आणि सरळ पद्धतीने महिला सभासदांचे नाव नोंदवलेजात असून दलालांकडे न जाता नारीशक्ती या मोबाईल ॲपद्वारे सुद्धा घरी बसल्या रजिस्ट्रेशन करता येणार आहे. सोबतच अंगणवाडी सेविका यांच्यामार्फत सुद्धा फॉर्म भरण्यास सुरुवात झाली आहे. त्याबरोबरच कुठल्याही सेतू सुविधा केंद्रावरून सुद्धायाची नाव नोंदणी करण्यात येत आहे. त्यामुळे महिलांकडून या योजनेसाठी पैसे घेतल्याचे निदर्शनास आल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा सुद्धा संध्याताई राठोड यांनी दिला आहे.



**किनवट, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अजितदादा पवार यांच्या 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना' या महत्वाकांक्षी योजनेचा प्रशासनाच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी व महिलांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. संध्याताई राठोड यांनी ईस्लापूरच्या अतिदुर्गम भागातील गावांना भेटी दिल्या. यावेळी किनवट भाजपा तालुकाध्यक्ष बालाजी अल्लेवार, किनवट महिला भाजपा आघाडीच्या तालुकाध्यक्षा सौ. उषाताई धात्रक, जिल्हा सरचिटणीस सौ. भावनाताई दिक्षीत, डॉ. प्रशांतजी राठोड उपस्थित होते.**

## किनवट नगरपरिषदची अतिक्रमण, विना परवानगी बॅनर आणि प्लास्टिक विरोधात धडक कार्यवाही

**किनवट,दि.११(प्रतिनिधी) : किनवट नगर परिषदच्यावतीने बुधवारी (दि.१०) शहारातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, भाजी मंडई, मासळी बाजार आणि जिजामाता चौक परिसरात अतिक्रमण, विना परवानगी बॅनर, बंदी असलेल्या प्लास्टिक विरोधात धडक मोहीम राबिविण्यात आली.**

प्लास्टिक बंदी अनुषंगाने या मोहिमेमध्ये राज्य शासनाने एकल वापर प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घातलेली असतानाही शहरातील दारूभट्टी चालकाकडून तिचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांच्याकडून पाच हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

शिवाजी महाराज चौक ते जिजामाता चौक परिसरात अनेक वर्षापासून अतिक्रमण करून ठाण मांडलेले किरकोळ व्यापारी, फेरीवाल्यांमुळे अरुंद झालेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन नागरिकांना अकारण त्रास भोगावा लागत होता.वारंवार सूचना देऊनही अतिक्रमणधारक ऐकत नसल्यामुळे शेवटी बुधवारी धडक मोहीम राबवून अतिक्रमण धारकांचे साहित्य, टेबल, जार ,बकेटस,कॅरेट, वजन काटे, विना परवानगी बॅनर आदी साहित्य जप्तीची कार्यवाही करण्यात आली. तसेच या मोहिमे अंतर्गत सुमारे २५ किलो एकल प्लास्टिक जप्त करण्यात आले असून, या धडक कार्यवाहीमुळे पालिका मख्याधिकारी मुगाजी काकडे हे शेवटी ॲक्शन मोडवर आले असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे.

दरम्यान, शहरातील व्यापारी, अतिक्रमण धारक, फेरीवाले, विना परवानगी बॅनर लावणाऱ्यांनी यापुढे नगर परिषदेच्या हद्दीत कुठलीही अवैध, गैरकायदेशीर कृत्य केल्यास कठोर कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा पालिकेकडून देण्यात आला.

अतिक्रमण निष्कासित करणे, विना परवानगी बॅनर काढणे, एकल प्लास्टिक जप्ती करीत दंड आकारणे आदी कार्यवाही दरम्यान पालिकेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी मुगाजी काकडे, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग प्रमुख अशोक भालेराव, अभियंता विनोद पवार, नगर रचना विभाग प्रमुख स्वानंद मामिडवार, क्षेत्रीय अधिकारी किरण कलगोटुवार,अतिक खान, स.जमीर, राजू पिल्लेवार, संदीप ढंडोरे, उमेश ढंडोरे, शेख रियाज, गजानन गाडेगे, रवी उपरपवार यांचेसह स्वछ्ता विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

अतिक्रमण काढतांना कायदा व सुव्यवस्था भंग होऊ नये म्हणून फौजदार सागर झाडे, हवालदार तुकाराम वाडगुरे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

मुख्याधिकारी काकडे ॲक्शन मोडवर



## महसूल कर्मचा-यांचा सोमवारपासून बेमुदत काम बंद आंदोलन

**किनवट,दि.१३ (प्रतिनिधी) : दांगट समितीचा अहवाल मंजूर करणे व रिक्त पदे भरणे आदी प्रलंबित मागण्यांसाठी महसूल कर्मचाऱ्यांनी आंदोलन पुकारले आहे. आंदोलना दरम्यान बुधवारी (दि.१०) काळया फिती लावून काम करण्यात आले. गुरुवारी (दि. ११) जेवणाच्या सुटीवेळी तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर कर्मचाऱ्यांनी निदर्शन केली. यावेळी जुनी पेन्शन लागू करण्यासह अन्य मागण्यांच्या प्रतिपूर्तीसाठी जोरदार घोषणा देण्यात आल्या. पुढे शुक्रवारी (दि.१२) कर्मचाऱ्यांनी लेखणीबंद आंदोलन केले. आता सोमवार, दि.१५ जुलैपासून महसूल कर्मचाऱ्यांच्यावतीने राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती येथील महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष गोविंद पांपटवार यांनी दिली.**

शासनस्तरावर वर्षानुवर्षां-पासून महसूल कर्मचा-यांच्या विविध मागण्या प्रलंबित आहेत. महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून हे आंदोलन केले जात आहे. सर्वात महत्वपूर्ण मागणी जुनी पेन्शनची आहे. तसेच महसूलचा सुधारित आकृतिबंध लागू करण्यात यावा. राज्यातील महसूल विभागात अव्वल कारकून-मंडळाधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार या पदावर पदोन्नती आदेश निर्गमित करावे. महसूलसाठी एक परीक्षा पद्धती लागू करताना महसूल सहाय्यकांचा ग्रेड-पे २४०० रुपये करावा आदी मागण्या आहेत.



यापूर्वी झालेल्या आंदोलनात राज्य शासनाने राज्य महूसल कर्मचाऱ्यांना मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्या आश्वासनाची पूर्ततः होत नसल्याने महाराष्ट्र राज्यातील सर्व महसुली कर्मचाऱ्यांकडून १० जुलैपासून टप्प्याटप्प्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे, येथील महसूल कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष रामेश्वर मुंडे यांनी सांगितले. यासंदर्भात येथील तहसीलदार शारदा चौंडेकर यांना दिलेल्या लेखी निवेदनावर संघटनेचे सर्व पदाधिकारी व महसूल कर्मचा-यांच्या स्वाक्ष-या आहेत.

## अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा-मारोती भरकड

**किनवट प्रतिनिधी : लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे प्रलंबित असलेले श्रावण बाळ वृद्धापकाळ योजना व संजय गांधी निराधार योजनेतील एकूण ५५६७ लाभार्थ्यांचे माहे एप्रिल ते जून अशा तीन महिन्याचे एकत्रित प्रत्येकी ४५०० रुच्या अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याची माहिती संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष मारोती भरकड यांनी दिली असून असून लाभार्थ्यांनी अनुदानाची रक्कम उचल करून घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आहे.**

श्रावण बाळ वर्धापकाळ योजनेअंतर्गत वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेल्या वृद्ध नागरिकांना शासनाकडून प्रतिमाह १५०० रुपये तर संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत व १५०० रु अनुदान देण्यात येते. किनवट तालुक्यात श्रावणबाळ वृद्धापकाळ योजनेचे एकूण २११५ लाभार्थी तर संजय गांधी निराधार योजनेत ३४५२ असे एकूण ५५६७ लाभार्थी आहेत.

परंतु लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान आचारसंहितेमुळे दोन्ही योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान प्रलंबित होते. दरम्यान आचारसंहिता संपुष्टात आल्याबरोबर संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष मारोती भरकड यांनी निराधार व वृद्ध नागरिकांच्या प्रलंबित अनुदानाबाबत तहसीलदार शारदा चोंडेकर यांच्याशी चर्चा करून पाठपुरावा केल्यानंतर तहसील प्रशासनाने दोन्ही योजनेतील एकूण ५५६७ लाभार्थ्यांचे माहे एप्रिल ते जून अशा एकूण तीन महिन्याचे एकत्रित प्रत्येकी ४५०० रु प्रमाणे अनुदानाची रक्कम ५ जुलै रोजी लाभार्थ्यांच्या पोस्ट व राष्ट्रीयकृत बँकेत जमा केली असून लाभार्थ्यांनी आपापल्या बँक खात्यातून अनदानाची रक्कम उचल करून घ्यावी असे आवाहन समितीचे अध्यक्ष मारोती भरकड यांनी केले आहे. तीन महिन्याचे एकत्रित ४५०० रु अनुदान एकाच वेळी प्राप्त होत असल्याने वृद्ध व निराधारांची आर्थिक हेळसांड दूर झाली आहे.




साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदूस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपुा, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com